


दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३२३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०४ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## पंढरीत ऐतिहासिक वारसा जपत चार मंदिरांचे पुनरुज्जीवन...

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत जीर्णोद्धार पूर्ण झालेल्या चार मंदिरांतील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा ४ व ५ जुलै रोजी विधीवत पार पडणार आहे. श्री व्यंकटेश मंदिर, श्री महालक्ष्मी मंदिर, श्री काशी अन्नपूर्णा मंदिर आणि कचेरीजवळील श्री मारुती मंदिर येथे हा धार्मिक सोहळा होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



श्री महालक्ष्मी मंदिर

पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक तंत्रज्ञान आणि आधुनिक संवर्धन पद्धतींचा वापर करून मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे. श्री व्यंकटेश मंदिराची मूळ दगडी रचना जतन करत प्रत्येक दगडाला क्रमांक देऊन मंदिराची पुनर्बांधणी करण्यात आली. चुन्याचा पाया, मूळ दगडांचा वापर आणि पारंपरिक शैलीतील नवीन शिखरामुळे मंदिराला पूर्ववैभव प्राप्त झाले आहे.

श्री महालक्ष्मी मंदिरावरील टाईल्स व रंगाचे थर हटवून बेसॉल्ट दगडाचे मूळ स्वरूप पुन्हा खुलविण्यात आले. लाईम पॉईंटिंग, नवीन दगडी फरशी, लाकडी भागांची दुरुस्ती आणि चुन्याच्या पारंपरिक तंत्राने शिखराचे काम पूर्ण करण्यात आले आहे. बाजीराव पडसाळ परिसरात तात्पुरत्या पत्र्याऐवजी कायमस्वरूपी हेरिटेज स्वरूपाचे शेड उभारण्यात आले असून भाविकांसाठी नैसर्गिक हवा, प्रकाश आणि विश्रांतीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच दगडी फ्लोअरिंग, एअर ॲब्रेशन, लाईम पॉईंटिंग आणि संरक्षक कोटिंगची कामेही पूर्ण झाली आहेत.

कचेरीजवळील श्री मारुती मंदिरालाही झाडांच्या मुळांमुळे पडलेल्या तड्यांवर उपाय करत काळ्या बेसॉल्ट दगड व चुन्याच्या मोर्टारच्या साहाय्याने पुनर्बांधणी करण्यात आली आहे. मंदिराच्या शिखरालाही पारंपरिक स्वरूप देत संरक्षणात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या संवर्धन प्रकल्पामुळे पंढरपूरच्या ऐतिहासिक आणि धार्मिक वारशाचे जतन करत मंदिरांचे मूळ स्वरूप पुनर्स्थापित करण्यात आले आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर ही सर्व मंदिरे भाविकांसाठी दर्शनासाठी खुली करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# मुंबईसह ७ जिल्ह्यांमध्ये आज रेड अलर्ट!

## संपूर्ण राज्यभारत बरसरणार जोरदार पाऊस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये मागील दोन-तीन दिवसांपासून जोरदार पावसाने हजेरी लावली असून पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. हवामान खात्याने पुणे घाट परिसराला आज, उद्या आणि परवा अशा तीन दिवसांसाठी, तर रायगड, नाशिक घाटपरिसराला आज आणि उद्या, तसंच मुंबई, ठाणे, पालघर आणि सातारा घाट परिसरात उद्या आणि परवासाठी पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे सदर जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे.



हवामान विभागाने आज दुपारी वर्तवलेल्या अंदाजानुसार, उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस, तसंच तुरळक ठिकाणी अतिवृष्टी होण्याची दाट शक्यता आहे. दक्षिण कोकण-गोवा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना , ताशी ४०-५० किमी वेगाने सोसाट्याचा वारा आणि तुरळक ठिकाणी अतिवृष्टी होण्याची दाट शक्यता आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना , ताशी ४०-५० किमी वेगाने सोसाट्याचा वारा आणि तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची दाट शक्यता आयएमडीकडून वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, नाशिक, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर, बुलढाणा, गडचिरोली, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांना आज ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

**पावसाची कशी आहे स्थिती?**

नैऋत्य मान्सूनने उत्तर अरबी समुद्राच्या काही भागांमध्ये, गुजरात, मध्य प्रदेशच्या उर्वरित भागांमध्ये आणि राजस्थान आणि हरियाणाच्या काही भागांमध्ये आणखी प्रगती केली असून नैऋत्य मान्सून उत्तर कोकण, गुजरात प्रदेश, सौराष्ट्र-कच्छ या भागांत सक्रिय आहे. कोकणातील बहुतेक ठिकाणी, दक्षिण मध्य महाराष्ट्र, तसेच मराठवाड्यात काही ठिकाणी दमदार पावसाने हजेरी लावली आहे.

## खापरखेड्यात नियम धाब्यावर बसवून क्वालिटी वाईन शॉपचा मनमर्जी कारभार




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०३, नागपूर :** राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे चौकी मुख्य बाजारपेठ परिसरात सुरू असलेल्या क्वालिटी वाईन शॉप प्रबंधकाने शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कथित आशीर्वादाने या ठिकाणी बिनधास्तपणे देशी-विदेशी दारूची विक्री सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे मुख्य बाजारपेठेतून ये-जा करणाऱ्या शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनावर विपरीत परिणाम होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

खापरखेडा परिसरात अनेक शाळा महाविद्यालय कार्यरत आहेत. दररोज शेकडो लहान मुले, मुली आणि विद्यार्थी याच मुख्य बाजारपेठेतून ये-जा करतात. विशेष म्हणजे या वाईन शॉपच्या अगदी समोरच बसस्थानक आहे. दुकानातून देशी व विदेशी दारूचे होणारे थेट प्रदर्शन येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या थेट नजरेस पडते. यामुळे शासनाच्या नियमांची सर्रास पायमल्ली होत असून देशाचं भवितव्य घडवणाऱ्या भावी पिढीवर वाईट संस्कार होत असल्याची तीव्र प्रतिक्रिया पालकांमधून उमटत आहे.

सूत्रांकडून दिलेल्या माहितीनुसार सदर क्वालिटी वाईन शॉप मध्ये विनापरवाना देशी-विदेशी दारूची विक्री केली जात आहे. विक्रीच्या नोंदी (सेल) दाखवण्यासाठी बोगस परवानाधारकांचा वापर केला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज आणि रेकॉर्डची सखोल तपासणी केल्यास मोठे सत्य बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**नौकरनामा नाही शिवाय नकाशातही तफावत!**

“ नियमानुसार वाईन शॉपमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याचा अधिकृत नौकरनामा असने बंधनकारक आहे. मात्र, या दुकानात कोणताही अधिकृत नौकरनामा नसल्याची माहिती सूत्रांनी दिली असून प्रत्यक्षात भलतेच लोक कामगार म्हणून कार्यरत आहेत. इतकेच नव्हे तर शासनाने मंजूर केलेला दुकानाचा नकाशा आणि प्रत्यक्ष दुकानाची रचना यात प्रचंड तफावत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.


**राज्य उत्पादन शुल्क विभागाची अर्थपूर्ण डोळेझाक?**

“ एकीकडे एवढा मोठा नियमबाह्य कारभार सुरू असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मात्र दरमहा या दुकानाचा पॉझिटिव्ह तपासणी अहवाल पाठवला जातो आहे. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभाग व वाईन शॉप प्रबंधका मध्ये नक्कीच कुठेतरी पाणी मुरत असल्याचे स्पष्ट चित्र आहे. शासनाच्या नियमांना वेशीवर टांगणाऱ्या क्वालिटी वाईन शॉपचा परवाना तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**अधिकाऱ्यांची उडवाउडवीची उत्तरे...**

“ या प्रकरणासंदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभाग सावनेर-कळमेश्वरचे उपनिरीक्षक योगेश यलसतवाड यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी कोणतीही ठोस माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिली. याबाबत अधीक्षकांशी संपर्क साधा असे सांगून त्यांनी आपली जबाबदारी झटकली.

## कल्याण-नगर-परळी रेल्वेमार्गासाठी माळशेज कृती समिती मैदानात...




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** अहिल्यानगर, पुणे व नाशिक या ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरा लाभलेल्या शहरांना जोडणाऱ्या पुणे-शिरूर-अहिल्यानगर-शिड-सिन्नर-नाशिक रेल्वेमार्गाला केंद्र सरकार व रेल्वे मंत्रालयाने नुकतीच मंजुरी दिली आहे. याबद्दल माळशेज रेल्वे कृती समितीच्या वतीने सरकारचे अभिनंदन करण्यात आले. या मंजुरीनंतर आता मुंबई-लातूर महामार्गाला समांतर असणाऱ्या कल्याण-मुरबाड-माळशेज-शिवनेरी-वासुंदेमार्गे अहिल्यानगर रेल्वेमार्गाला मंजुरी देऊन हा रेल्वेचा त्रिकोण पूर्ण करावा, अशी मागणी समितीने केली आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यास देशाची पश्चिम व पूर्व किनारपट्टी थेट मुंबई ते विशाखापट्टनम अशी जोडली जाईल. यामुळे कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याला मुंबईशी जोडणारा देशातील सर्वात मोठा रेल्वे प्रकल्प साकार होईल, असा विश्वास समितीने व्यक्त केला आहे.

या रेल्वे प्रकल्पामुळे बीड, परळी, अहिल्यानगर, जुन्नर आणि मुरबाड परिसरातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी भर पडणार आहे. अकोले व संगमनेरच्या डोंगराळ भागाचा कायापालट होऊन माळशेज, शिवनेरी, लेण्याद्री आणि भीमाशंकर परिसरात पर्यटन उद्योगाला मोठी चालना मिळेल, ज्यामुळे रोजगार निर्मिती होईल. तसेच साखर, भाजीपाला व फळे मुंबईमार्गे थेट देश-विदेशात निर्यात करणे शक्य होणार आहे. मुंबई-ठाणेची श्रीमंती, पुण्याची विद्वत्ता आणि अहिल्यानगरचा सहकार या त्रिवेणी संगमातून महाराष्ट्राच्या प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल.

स्वातंत्र्यसेनानी स्व. गोविंदभाई श्रॉफ, स्व. केशरकाकू क्षीरसागर, स्व. गोपीनाथ मुंडे, स्व. बाळासाहेब विखे पाटील यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांनी या प्रकल्पाची मागणी केली होती. माळशेज रेल्वे कृती समिती सन १९९६ पासून यासाठी सातत्याने पाठपुरावा करत असून, निर्धार मेळावे, रथयात्रा आणि ५ लाख स्वाक्षऱ्यांची मोहीम यापूर्वी राबवण्यात आली आहे. २००६ मध्ये याचे सर्व्हेक्षण झाले आणि २०१९ मध्ये मुरबाड पर्यंत पहिल्या टप्प्याला मंजुरी मिळाली. हा पहिला टप्पा मढ - शिवनेरी पर्यंत वाढवणे व्यावहारिक दृष्ट्या सोयीचे ठरले. या लढ्याला जेष्ठ नेते शरद पवार व अण्णा हजारे यांचे आशीर्वाद लाभले आहेत.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण हितासाठी कल्याण - अहिल्या नगर या थर्ड घाट रेल्वे प्रोजेक्टच्या मंजुरीसाठी भविष्यात बीड व परळी पासून सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना आणि तरुणांना संघटित करून तीव्र संघर्ष उभारण्याचा निर्धार कृती समितीचे अध्यक्ष दिनेशचंद्र हुलवळे, उपाध्यक्ष मुरलीधर गुंजाळ, दादा भालेकर आणि मिलिंद गंधे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य वैभव काळे देखील उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवडकरांसाठी पवना जलवाहिनी प्रकल्प २ वर्षांत पूर्ण करण्याचा प्रयत्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, मुंबई :** पिंपरी-चिंचवड महानगर क्षेत्राची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता पवना जलवाहिनी प्रकल्प तातडीने मार्गी लावणे आवश्यक असून, शासनाकडून आवश्यक अनुदान उपलब्ध करून हा प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.





सदस्य महेश लांडगे यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चा सूचनेला उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, २०२९-३० पर्यंत पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या सुमारे ५५ लाखांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज असून शहराला सुमारे २,९४९ एमएलडी पाण्याची आवश्यकता भासणार आहे. ही भविष्यातील गरज लक्षात घेऊन पवना जलवाहिनी प्रकल्प पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या खर्चात वाढ होऊन तो आता सुमारे १,०१५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. या प्रकल्पासाठी शासनाकडून अनुदान कशा स्वरूपात देता येईल, याचा विचार सुरू आहे. तसेच प्रकल्पाला विरोध करणाऱ्या धरणग्रस्त व स्थानिक संघटनांच्या मागण्या समजून घेऊन त्यांचे योग्य निराकरण करतच प्रकल्प पुढे नेण्यात येईल.

या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल आधीच आयआयटी मुंबईकडून तयार करून घेण्यात आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीत हा अहवाल सादर केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




## विसंगत वेळापत्रकाचे दुखणे

शैक्षणिक धोरणात आमूलाग्र बदल करण्याचा हेतू मनात ठेवून 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' जाहीर झाले. त्यावर आधारित आराखडा (एनसीएफ) प्रसिद्ध झाला. राज्याच्या गरजेनुसार बदलाचे स्वातंत्र्य देऊन, राज्यासाठी धोरण ठरवण्याचे आदेश निघाले. त्यानुसार 'पायाभूत स्तर' आणि 'शालेय शिक्षण' अशा दोन भागांचा राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला. पाठ्यपुस्तक बदलाचे कालबद्ध वेळापत्रक जाहीर करण्यात आले. त्यानुसार २०२५-२०२६मध्ये इयत्ता पहिलीचे नवे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यासोबतच इयत्ता पहिली आणि दुसरीसाठी तासिका विभागणीचे मार्गदर्शक आदेश देण्यात आले. यंदा २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीचा अभ्यासक्रम नव्याने तयार करण्यात आला. या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे, सुधारित धोरणानुसार इयत्तानिहाय तासिका विभागणीचे परिपत्रक प्रसिद्ध होण्यास १२ जून उजाडला; जे एप्रिलमध्येच येणे अपेक्षित होते. शिक्षकनिहाय तासिका विभागणी करून, त्यानुसार संपूर्ण शाळेचे वेळापत्रक बनवणे आणि त्यानुसार प्रत्येक इयत्ता व तुकडीचे; तसेच शिक्षकाचे वेळापत्रक बनवणे हे अत्यंत जिकिरीचे, काळजीपूर्वक करण्याचे काम आहे. यासाठी किमान १५ ते २० दिवसांचा कालावधी मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षक यंत्रणेला आवश्यक असतो. या संदर्भात महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांशी संपर्क साधला असता, 'माझ्याशी फक्त धोरणात्मक बाबींसंदर्भात बोला, अन्य माहिती इतर स्टाफकडून घ्या,' असे उत्तर ऐकायला मिळाले. तासिका विभागणी या प्रशासनातील अत्यंत महत्त्वाच्या धोरणात्मक बाबीविषयी कोणतेही गांभीर्य नसल्याचे जाणवले.

सन २०१६च्या शासन निर्णयानुसार 'एससीईआरटी' ही शिखर संस्था म्हणून जाहीर झाली आहे. बालभारतीची स्वायत्तता संपली, एसएससी बोर्डाकडून नववी ते बारावीच्या पाठ्यपुस्तक निर्मितीचे काम काढून, फक्त परीक्षा आयोजनापुरते काम राहिले आहे. अशा स्थितीत 'एससीईआरटी'ची जबाबदारी वाढली आहे; पण वास्तव विपरीत आहे. १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या या आदेशात इयत्ता तिसरी ते पाचवी या गटासाठी आणि इयत्ता सहावी ते आठवी या गटासाठी विषयनिहाय तासिका विभागणी; तसेच अन्य शालेय कामकाजासंदर्भात काही सूचना देण्यात आल्या आहेत. यातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे, संपूर्ण वर्षाच्या कामकाजाबाबत दिलेल्या सांख्यिकी माहितीत, वर्षातील २१० दिवस प्रत्यक्ष वर्गात अध्ययन-अध्यापन कार्य होणे अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. याशिवाय परीक्षा मूल्यांकन व अनुषंगिक कामांसाठी फक्त १४ दिवसांचा कालावधी दिला आहे, तर १३ दिवस हे दप्तराविना शाळा, शैक्षणिक सहल आणि शिबिर अशा सहशालेय उपक्रमांसाठी दिले आहेत. 'आरटीई'मधील उल्लेखाचा विपरीत अर्थ घेऊन, प्रत्यक्ष शालेय अध्यापन कामकाजाचे दिवस २१० दाखवले आहेत. पायाभूत चाचणी, प्रथम सत्र परीक्षा आणि द्वितीय सत्र परीक्षा यांचा कालावधी पाहिल्यास, तो सुमारे २२ दिवस होतो. याशिवाय प्रत्येक विषयाच्या तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, कला, क्रीडा, कार्यानुभव यांच्या परीक्षा यांसाठी लागणारा वेळ भिन्न आहे.

मागील दोन वर्षांपासून अगदी शेवटच्या आठवड्यापर्यंत चालणाऱ्या परीक्षा वेळापत्रकामुळे, मूल्यांकनाच्या कामासाठी मिळणारे पाच दिवस विचारात घेतले, तरी सुमारे तीस दिवसांचे कामकाज असताना १४ दिवस कोणत्या हिशेबाने धरले आणि असा हिशेब करणारे तज्ज्ञ मार्गदर्शक कोण, याचाही शोध घ्यायला हवा. शासनाच्या आदेशाने प्रत्येक शनिवार हा 'आनंददायी शनिवार' असावा आणि त्यातच 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम समाविष्ट असताना, यासाठी तेरा दिवसांचाच उल्लेख आहे. हे तेरा दिवस मुळातच शालेय क्रीडास्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, पारितोषिक वितरण समारंभ आणि शैक्षणिक सहल व क्षेत्रभेट यांतच वापरले जातात. आपल्याच शासकीय आदेशाचा विचार न करता अशा प्रकारचे वार्षिक नियोजन कसे काय तयार होते, हा प्रश्न आहे. तासिका विभागणीबाबत दिलेल्या सूचनेत तिसऱ्या भाषेच्या अंमलबजावणीतील संदिग्धता दिसते. यामुळेच पुढील वर्षी इयत्ता पाचवीला तिसरी भाषा असणार किंवा नाही, हा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९४ हजारांहून अधिक विद्यार्थी मातृभाषा मराठीत अनुत्तीर्ण आहेत. याबाबत सर्व जण गांभीर्याने विचार करीत असतानाच, तासिका विभागणीत मात्र सहावी ते आठवीच्या गटासाठी तिन्ही भाषांच्या यापूर्वी असणाऱ्या प्रत्येकी सहा तासिकांऐवजी फक्त चार तासिका दिल्या आहेत. याबाबत विचारणा केली असता, तज्ज्ञांनी वेळापत्रक तयार केले आहे, असे मोघम उत्तर दिले गेले. राज्याचे प्रमुख म्हणून सविस्तर स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी संचालकांचीच आहे; ती टाळून चालणार नाही.

**- महेंद्र गणपुले**

# जिकडे झाडे, तिकडे पाऊस !!

एकेकाळी पृथ्वीतलावर झाडांची अमाप संख्या होती. जिकडे बघावे तिकडे नुसती झाडेच झाडे दिसायची. शेत शिवारात फेरफटका मारायला एकट्याने जायचे म्हटल्यावर कोणाचीच हिंमत होत नसे. पूर्ण शेत शिवार झाडांमध्ये लपलेला आणि हिरवळीने नटलेला दिसायचा. निसर्गाचे लाजवाब सृष्टी सौंदर्य पाहून प्रत्येकाचे मन आनंदाने तृप्त होऊन गाणे गायचे. कारण तेव्हा झाडांची एवढी प्रचंड गर्दी पृथ्वीवर आपल्याला पाहायला मिळायची. म्हणून त्याकाळी पाऊस वेळेवर पडायचा आणि वेळेवरच बंद व्हायचा. म्हणजे शेतातील पिकांना पुरेसा पाऊस पडायचा. आताच्या सारखी ना अतिवृष्टी व्हायची, ना कोरडा दुष्काळ पडायचा. शेतातील हिरवळीने नटलेली पिके आनंदाने थुई थुई नाचायची. जोमाने शेतात आलेली पिके पाहून सगळे शेतकरी आनंदाने सुखावून जायचे. प्रत्येक पीक त्या त्या ऋतूमध्ये काढले जायचे. धरणीमाय सुद्धा काढणीला शेतकऱ्यांना भरपूर बरकत द्यायची. म्हणून सगळे शेतकरी बांधव आनंदात असायचे. गुण्यागोविंदाने आपला घर प्रपंच चालवायचे. त्याकाळी शेतकऱ्यांवर कधीच वाईट दिवस आले नाहीत. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण त्याकाळी शून्य होते. सांगायचा मुद्दा असा की, त्याकाळी सगळीकडे झाडेच झाडे असायची म्हणून पाऊसही दमदार पडायचा आणि सगळा शेत शिवार ओलाचिंब करून टाकायचा. नद्या, नाले, ओढे, तलाव आणि विहिरी ओसंडून वाहायच्या. तेव्हाचा पाऊस कहरही करत नव्हता आणि पिकांना अपुराही पडत नव्हता. म्हणजे शेतीला पुरेसा पाऊस पडायचा. म्हणून शेती सुद्धा उत्तम पिकायची आणि धनधान्याने शेतकऱ्यांची ओटी भरायची.

परंतु आता शेतकऱ्यांवर अतिशय वाईट दिवस आले आहेत. शेतकऱ्यांच्या नशिबात एक तर ओला



दुष्काळ आहे, नाहीतर कोरडा दुष्काळ आहे. पाऊस नाही पडला तरीही पिकांचे नुकसान आणि पाऊस पडला तरीही पिकांचे नुकसान. सांगायची बाब अशी की, अतिवृष्टी आणि दुष्काळ या दोन्हींच्या कचाट्यात आज बळीराजा अडकला आहे. आता पावसाला मोसमी पाऊस म्हणता येणार नाही. कारण आता उन्हाळ्यात पावसाळा आणि पावसाळ्यात हिवाळा असे ऋतुचक्र बनले आहे. पावसाला ऋतुचक्राचा ठराविक काळ राहिलाच नाही. कोणत्याही ऋतूत बरसत आहे आणि जेव्हा पावसाची गरज आहे, नेमका त्याच काळात लपून बसत आहे. असे भयावह चित्र सध्या आपल्याला सर्वत्र पाहायला मिळत आहे. आणि याला कारणीभूत दुसरे तिसरे कोणी नसून आपणच आहोत. आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. कारण लोकसंख्या वाढत गेली आणि लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडू लागली. म्हणून माणसांनी स्वतःच्या भल्यासाठी मोठमोठे जंगले नष्ट करून त्या ठिकाणी प्लॉटिंग पाडली आणि मोठमोठ्या इमारती, कारखाने, विविध उद्योगधंदे, वाड्या आणि तांडे उभे करून जंगलाची जागा माणसांनी घेतली आणि एकेकाळी हिरवागार दिसणारा निसर्ग आता भकास, उजाड आणि विद्रूप दिसू लागला. झाडांची कमी होणारी संख्या याचा परिणाम थेट ऋतुचक्रावर झाला. सगळे ऋतुचक्र बदलून गेले. म्हणून आता पाऊस वेळेवर पडत नाही. पडला तरीही अवकाळी पडतो. नाहीतर पडत सुद्धा नाही. याचे एकमेव कारण म्हणजे अमाप झाडांची होणारी कत्तल आणि त्यातून कमी होणारी झाडांची संख्या याला कारणीभूत आहे. म्हणून सध्या महाराष्ट्राच्या काही भागात म्हणावा तसा पाऊस बरसत नाही. परंतु जिकडे अमाप झाडे आहेत, तिकडे मात्र मुसळधार पाऊस पडत आहे. आणि सगळ्या शेत शिवारात पाणीच पाणी होत आहे. कारण म्हणजे, झाडे आणि पाऊस यांचा अतिशय घनिष्ट आणि परस्पर पूरक असा संबंध आहे. झाडे त्यांच्या मुळांद्वारे जमिनीत पाणी मुरवतात आणि बाष्पोत्सर्जन प्रक्रियेद्वारे ते पाणी बाष्पाच्या रूपात हवेत सोडतात आणि नंतर हे बाष्प हवेत वर जाऊन ढग बनवतात आणि त्यामुळे चांगला पाऊस पडण्यास मदत होते. आता हल्ली झाडांची संख्या खूपच कमी झाली आहे, आणि आता याचा परिणाम थेट ऋतुचक्रावर झाला आहे. सगळे ऋतुचक्र बिघडून गेले आहे. आणि जिकडे झाडे आहेत, तिकडे मात्र पाऊस चांगला बरसत आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांचे खूप हाल-हाल होत आहेत. शेतात पेरणी करूनही पाऊस पडत नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. पाण्याविना मुक्या जनावरांचे प्रचंड हाल होत आहेत. केवळ शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी पुर्णपणे आतून बाहेरून खचले आहेत. घर प्रपंच चालवणे आणि त्यासाठी सावकाराचे कर्ज काढणे शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी झाली आहे. शेतकरी आभाळाकडे पाहत पावसाची वाट बघत आहेत. आभाळ येत आहे, आकाशात काळेकुट्ट ढग जमा होत आहेत. विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट होत आहे, मात्र पाऊस काही पडत नाही आणि शेतकऱ्यांच्या आशा काही पल्लवीत होत नाहीत. शेतकरी हवालदिल होऊन कर्जाचा डोंगर आणि संसाराचा भार पेलवत नसल्यामुळे आत्महत्या करून स्वतःची जीवन यात्रा संपवत आहेत. हल्ली शेतकरी आत्महत्येचे सत्र वेगाने चालूच आहे. देशात शेतकरी आत्महत्या हा विषय अतिशय गंभीर आहे. रोज कुठे ना कुठेतरी शेतकरी आत्महत्या करतोच आणि आपली जीवनयात्रा संपवतोच! अशा दुर्दैवी घटनांना आळा घालायचा असेल तर आता सगळ्यांनी एकत्र येऊन आणि मनावर घेऊन असा निर्धार करायला हवा की, मी आता इथून पुढे एकही झाड तोडणार नाही आणि दुसऱ्यांनाही तोडू देणार नाही. जर कोणी तोडतच असेल तर त्याला झाडाचे महत्त्व समजावून सांगेल किंवा तो ऐकण्यास तयार नसेल तर त्याला पोलिसांच्या स्वाधीन करेल. असा पक्का निर्धार करून प्रत्येकाने खूप खूप झाडे लावावेत, झाडांचे संगोपन करावे आणि वृक्षतोड करणाऱ्यास कडक शासन करायला हवे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी झाडांचे महत्त्व पटवून द्यायला हवे. आज आपल्यावर जी वाईट वेळ आलेली आहे, ती केवळ वृक्षतोड केल्यामुळेच.

म्हणून प्रत्येकाने झाडांचे मोल जाणून घ्यावे आणि वृक्षतोड केल्यास त्याचे काय परिणाम होतात हे देखील माहिती करून घ्यावे. आणि शेतात, रोडच्या कडेने, मोकळ्या जागेत, रानातील बांधावर, स्मशानभूमीत झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, त्यांची खूप खूप काळजी घ्यावी, जिकडे झाडे, तिकडे पाऊस ही म्हण लक्षात घ्यावी आणि भकास, उजाड आणि विद्रूप झालेला निसर्ग पुन्हा एकदा हिरवळीने नटूवूया...आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आनंदाची मंगलमय पहाट आणूया...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# शिव-शिवा : श्रावण... भक्ती, प्रेम आणि निसर्गाचा मंगल सोहळा

श्रावण महिना म्हणजे केवळ पंचांगातील एक महिना नव्हे; तो भक्ती, प्रेम, संयम, समर्पण आणि निसर्गाच्या नवचैतन्याचा उत्सव आहे. या महिन्याच्या आगमनाने संपूर्ण सृष्टीच जणू नवजीवनाने बहरून जाते. हिरवाईने नटलेले डोंगर, वेलींनी वेढलेली झाडे, खळाळणारे धबधबे, पावसाच्या सरींनी चिंब झालेली धरती आणि वातावरणात दरवळणारी गुलाबी थंडी... हे सारे दृश्य मनाला प्रसन्न करून टाकते.

जसा बीजाला अंकुर फुटतो, तशीच श्रावणात प्रत्येकाच्या अंतःकरणात भक्तीची पालवी फुटू लागते. ॐ नमः शिवाय या मंत्राचा जप मनाला शांततेकडे, तर आत्म्याला परमेश्वराकडे घेऊन जातो.

श्रावण म्हटला की शिव-पार्वतींच्या दिव्य प्रेमकथेची आठवण मनात जागी होते. लहानपणापासूनच माता पार्वतींच्या हृदयात महादेवांप्रती अखंड भक्ती होती. नारदमुनींनी त्यांना सांगितले होते की, तुमचे आणि महादेवांचे नाते जन्मोजन्मीचे आहे. परंतु या जन्मात त्यांना प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या करावी लागेल. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा अखंड जप आणि निस्सीम श्रद्धा यांच्यामुळेच महादेव तुम्हाला पत्नी म्हणून स्वीकारतील.

महादेव म्हणजे वैराग्य, त्याग, करुणा आणि अनंताचे स्वरूप. त्यांचे वर्णन शब्दांत करणे कठीण; त्यांना केवळ निर्मळ अंतःकरणाने अनुभवता येते. म्हणूनच माता पार्वतींनी माता मैना आणि पिता हिमालय यांची परवानगी घेऊन वनात जाऊन हजारो वर्षे कठोर तपश्चर्या केली. अखेर त्यांच्या भक्तीने आणि प्रेमाने प्रसन्न होऊन महादेवांनी दर्शन दिले आणि विवाहास संमती दिली.

शिव-पार्वतींचे हे मिलन केवळ दोन व्यक्तींचे नव्हते; ते श्रद्धा, संयम, प्रेम आणि समर्पणाच्या विजयाचे प्रतीक होते. म्हणूनच श्रावण महिना



त्यांच्या या दिव्य प्रेमाची आठवण करून देतो.

जसा आपण अनेक महिने पावसाची आतुरतेने वाट पाहतो, तशीच प्रत्येक प्रतीक्षेमागे विश्वास, संयम आणि आशा दडलेली असते. पावसाच्या पहिल्या सरींनी धरतीमातेची तहान भागते. ती आपल्या प्रियकराच्या भेटीने तृप्त झाल्यासारखी आनंदून जाते, आणि आकाशही त्या ओढीला प्रतिसाद देत मनसोक्त बरसत राहते.

शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर नव्या आशेची पालवी फुटते. शेतात उगवणारे प्रत्येक रोप नव्या जीवनाचा संदेश देत असते. निसर्गातील प्रत्येक कण जणू सांगत असतो की, प्रेम असेल तर सृष्टी फुलते आणि श्रद्धा असेल तर अशक्यही शक्य होते.

आजच्या धावपळीच्या, स्वार्थी आणि अस्थिर जगात श्रावण आपल्याला थांबून स्वतःकडे पाहायला शिकवतो. नात्यांमध्ये विश्वास जपायला शिकवतो. प्रेमात संयम, भक्तीत सातत्य आणि जीवनात नम्रता ठेवायला शिकवतो. कारण खरी भक्ती केवळ देवळात नतमस्तक होण्यात नसते; ती आपल्या विचारांत, आचरणात आणि प्रत्येक नात्यात प्रकट झाली पाहिजे.

शिव-शिवाची प्रेमकथा सांगते की, प्रेम हे मिळवण्यापेक्षा पात्र होण्याचा प्रवास आहे. भक्ती म्हणजे मागणे नव्हे, तर स्वतःला घडवणे आहे. आणि श्रावण म्हणजे त्या घडण्याचा, त्या समर्पणाचा आणि त्या दिव्य प्रेमाचा पवित्र उत्सव आहे.

**हर हर महादेव !**

**: लेखिका :**
**कल्याणी पवार**
**मो.९७५५९२६२४५**

## चुका काढे ?

थोडा पडला पाऊस
जरासा इकडे तिकडे
काय केले आम्ही बा
आम्हांशी घेई वाकडे

धडा धडा कोसळती
रस्त्यावर कशी झाडे
सरसावले लगे कॅमेरे
आमची इज्जत काढे

मॅन होल मध्ये नेमके
पादचारी कसे ते पडे
दिसलेनाही का एवढे
मॅनहोलअसे ते उघडे

कळत नसे रस्त्याला
कशाला भगदाडे पडे
आत्ता बांधले न तुला
निमित्त कसले सापडे

गटारी पण खोडसाळ
गं तुंबल्या सगळीकडे
नेमकेतिलाच भेटतात
कसे लहान मोठे ओढे

दिला होता रे अहवाल
काम झाले आहे थोडे
कायकरणार आम्ही रे
पावसानेनाचवले घोडे

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचल बातमी

# प्रेम की विकृती ?



प्रेम हा शब्द उच्चारला की डोळ्यांसमोर विश्वास, आपुलकी, त्याग आणि जिव्हाळा उभा राहतो. पण आजकाल घडणाऱ्या काही घटना पाहिल्या की मन सुन्न होतं. ज्याच्यावर प्रेम असल्याचं सांगितलं जातं, त्याचाच जीव घेण्याइतकी माणसाची मानसिकता कशी बदलू शकते? हा प्रश्न प्रत्येक संवेदनशील मनाला अस्वस्थ करून जातो.

आज समाजात प्रेमाच्या नावाखाली घडणाऱ्या हत्या, फसवणूक आणि हिंसाचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. अशा घटना केवळ एका व्यक्तीचा जीव घेत नाहीत, तर दोन कुटुंबांची स्वप्नं, विश्वास आणि आयुष्य उद्ध्वस्त करून जातात. प्रेमासारख्या पवित्र भावनेलाही त्या कलंक लावतात.

आई-वडील आपल्या मुलांना मोठ्या विश्वासाने शिक्षणासाठी घराबाहेर पाठवतात. त्यांच्या डोळ्यांत असतात असंख्य स्वप्नं. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून ते मुलांच्या भविष्यासाठी रात्रंदिवस कष्ट करतात. त्यांना वाटतं, आज आपलं मूल शिकेल, उद्या स्वतःच्या पायावर उभं राहील आणि आमचाही आधार बनेल. पण काही वेळा त्यांच्या विश्वासाचं उत्तर अशा दुर्दैवी घटनांमध्ये मिळतं, हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. याचा अर्थ प्रत्येक तरुण किंवा प्रत्येक प्रेमसंबंध चुकीचा असतो, असा अजिबात नाही. अनेक तरुण-तरुणी प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि पालकांचा सन्मान राखत आपलं आयुष्य घडवत आहेत. मात्र काहींची चुकीची मानसिकता संपूर्ण पिढीवर प्रश्नचिन्ह उभी करते.

खरं प्रेम कधीच मालकी हक्क गाजवत नाही. ते विश्वास जिंकतं, संयम शिकवतं, समोरच्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आणि निर्णयाचा आदर करतं. नातं टिकवण्यासाठी संवाद हवा असतो, हिंसा नाही. मतभेद असतील तर ते बोलून सोडवता येतात; जीव घेऊन नाही.

एक क्षणाचा राग, अहंकार किंवा सूड... आणि त्याची शिक्षा अनेक निष्पाप लोकांना आयुष्यभर भोगावी लागते. एका चुकीच्या निर्णयामुळे स्वतःचं भविष्य संपतं, समोरच्या व्यक्तीचं आयुष्य हिरावलं जातं आणि दोन्ही कुटुंबांच्या आयुष्यात कायमचा अंधार पसरतो. म्हणूनच प्रत्येक तरुणाने स्वतःला एक प्रश्न विचारावा मी जे पाऊल उचलतोय, त्याचे परिणाम काय असतील? हा एक विचार अनेक जीव वाचवू शकतो.

प्रेम करा... पण समजूतदारपणे. विश्वासाने करा... पण जबाबदारीने. आई-वडिलांचा सन्मान ठेवा, त्यांच्या भावनांना समजून घ्या आणि कोणताही मोठा निर्णय संवादातून घ्या.

कारण प्रेम जीव देण्याची प्रेरणा देतं, जीव घेण्याची नाही.

चला, माणुसकी जपूया. प्रेमाची खरी व्याख्या समजून घेऊया. कारण सुंदर समाज घडवण्याची सुरुवात आपल्या विचारांपासूनच होते.

**: लेखिका :**
**कल्याणी पवार**
**मो.९७५५९२६२४५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बदलत्या हवामानामुळे जलसंधारणाची कामे करा - सुजित झावरे पाटील

### गाजदीपूर येथील पाझर तलाव खोलीकरण कामाचा शुभारंभ




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** बदलत्या हवामानामुळे दुष्काळ व अतिवृष्टीचे संकट वारंवार निर्माण होत असल्याने निसर्गाचा इशारा वेळेत ओळखून जलसंधारणाची कामे हाती घेणे ही काळाची गरज आहे. पाझर तलाव, बंधारे आणि जलसाठे मजबूत केल्यास भविष्यातील पाणीटंचाईवर प्रभावी मात करता येईल, असे प्रतिपादन शिवसेना नेते तथा माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केले.

गाजदीपूर (वडगाव सावताळ) येथील पाझर तलाव खोलीकरण कामाचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजितराव झावरे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार अभियानांतर्गत सुरू झालेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता वाढणार असून परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. जलसंधारण आणि ग्रामीण विकासाला चालना देणाऱ्या या कामासाठी सर्व ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत लोकसहभागातून अशा विकासकामांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी हा उपक्रम निश्चितच मैलाचा दगड ठरणार आहे. यावेळी युवा नेते स्वप्निल झावरे, राजेंद्र रोकडे, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे, योगेश रोकडे, दत्ता शिंदे, अमोल शिंदे, इंजि. प्रसाद झावरे, किरण रंधवन, इंजि प्रतीक लोळगे, उत्तम नऱ्हे, दादाभाऊ नऱ्हे, पाटीलनाना सातकर, सागर करगळ, सुभाष करगळ, खंडू कोळेकर, देवका बर्डे, अशोक सातकर, बाळासाहेब सातकर, संतोष करगळ, बाबासाहेब काळे, विशाल तिखोळे, विष्णू करगळ, शिवाजी खटके, विकास कोळेकर आदी उपस्थित होते.

## HSRP नंबर प्लेट नसल्यास १ जुलैपासून दंडात्मक कारवाई; उपप्रादेशिक परिवहन कार्यालय - कल्याणचे आवाहन




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०३, कल्याण (ठाणे) :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांनी वाहनधारकांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (कडठझ) बसविण्याबाबत महत्त्वाचे आवाहन केले आहे. महाराष्ट्र राज्यातील ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर कडठझ बसविणे बंधनकारक करण्यात आले असून, अंतिम मुदत ३० जून २०२६ पर्यंत देण्यात आली होती. परिवहन विभागाने कल्याण कार्यालयासाठी M/s REAL MAZON INDIA LTD. या संस्थेची HSRP बसविण्यासाठी नियुक्ती केली असून, वाहनधारकांनी https://hsrpmhzone2.in या पोर्टलवरून ऑनलाइन नोंदणी करून नंबर प्लेट बसवून घ्यावी.

परिवहन आयुक्तांच्या निर्देशानुसार १ जुलै २०२६ पासून HSRP नसलेल्या वाहनांवर वायुवेग पथकामार्फत दंडात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे. मात्र, ३० जून २०२६ पर्यंत HSRP बसविण्यासाठी अपॉईंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांवर कारवाई करण्यात येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र (RC) नूतनीकरण, वाहन हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा चढविणे/उतरविणे, दुय्यम आरसी, ना-हरकत प्रमाणपत्र (NOC), वाहनातील बदल यांसह विविध वाहन विषयक सेवा HSRP बसविल्याशिवाय उपलब्ध होणार नाहीत. तसेच वायुवेग पथकाने जप्त केलेली वाहनेही HSRP बसविल्यानंतरच सोडण्यात येणार असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. वाहनधारकांनी कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी तातडीने HSRP बसवून शासनाच्या निर्देशांचे पालन करावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांनी केले आहे.

## आषाढी एकादशी निमित्त स्वामिनी फाउंडेशनची दिंडी स्वरांची अभंग गायन स्पर्धा

### विद्यार्थ्यांना सहभागाचे आवाहन

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०३, सोलापूर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधत स्वामिनी फाउंडेशन, सोलापूर यांच्या वतीने आणि द्वारकाधीश क्लासेस प्रस्तुत दिंडी स्वरांची अभंग गायन स्पर्धा – २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी चैत्राली हॉल, विजापूर रोड, सोलापूर येथे उत्साहात पार पडणार आहे. भक्ती, संस्कार आणि सेवाभाव यांच्या माध्यमातून सुसंस्कृत, सक्षम आणि कलावंत पिढी घडविण्याचा संकल्प स्वामिनी फाउंडेशनने हाती घेतला असून, त्याच उद्देशातून या अभंग गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १० ते २५ वर्षे वयोगटातील इच्छुक स्पर्धकांसाठी ही स्पर्धा खुली असून, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच महाराष्ट्राच्या समृद्ध अभंग परंपरेचे जतन व संवर्धन करण्याचा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

स्वामिनी फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच जनजागृतीपर विविध उपक्रम सातत्याने राबविले जात असून, या स्पर्धेमुळे युवकांमध्ये भक्तीपर संगीताची आवड वाढण्यास आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन होण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

स्पर्धेतील उत्कृष्ट विजेत्यांना रोख पारितोषिके, आकर्षक ट्रॉफी व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार असून, सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी नियोजक गिरीश लोंढे यांच्याशी मो. ९८८१७८२२४७ या क्रमांकावर संपर्क साधून नावनोंदणी करावी. सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी, पालक आणि संगीतप्रेमींनी या उपक्रमाचा लाभ घेत स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन स्वामिनी फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा श्रीमती दीपा शेटे, सचिव संगीता पवार आणि कार्याध्यक्षा डॉ. पौर्णिमा लांडगे यांनी केले आहे.

## काय समजलीव आयोजित 'कोण होणार कोकणचा पहिला रिलबाज' स्पर्धेचा भव्य सोहळा

# डिजिटल माध्यमातून कोकणच्या लोककलेचा जागर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०३, (रत्नागिर) :** रत्नागिरीच्या सांस्कृतिक आणि कलाविश्वात डिजिटल क्रांती घडवून आणणाऱ्या 'काय समजलीव' या संस्थेच्या वतीने आयोजित 'कोण होणार कोकणचा रिलबाज' ही स्पर्धा यंदाही अभूतपूर्व उत्साहात संपन्न झाली. सलग दुसऱ्या वर्षी आयोजित या स्पर्धेने कोकणातील उदयोन्मुख क्रिएटर्सना एक हक्काचा आणि भव्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

'नमन कोकणची लोककला' या विषयावर आधारित या स्पर्धेत सहभागी झालेल्या तब्बल १४८ स्पर्धकांनी आपल्या कल्पकतेचा आणि तांत्रिक कौशल्याचा कस लावत कोकणच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन डिजिटल रील्सच्या माध्यमातून घडवून आणले.

आयोजक प्रणय पाटील आणि त्यांच्या 'काय समजलीव' टीमने अत्यंत




कल्पकतेने या स्पर्धेचे नियोजन केले होते. स्पर्धेत सादर करण्यात आलेल्या रील्सचा दर्जा पाहून उपस्थितांनी उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून अनुभवी प्रदीप शिवगण आणि जाधव सर यांनी काम पाहिले असून, त्यांनी निकोप स्पर्धेतून सर्वोत्तम कलाकृतींची निवड केली. या स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकांमध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून श्रेयस मईन, सर्वोत्कृष्ट लेखक म्हणून साहिल चरकारी, सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून प्रथमेश पवार, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून साक्षी बने आणि सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार म्हणून साईप्रसाद विलणकर (vošazadšparinda) यांना गौरविण्यात आले.

मुख्य स्पर्धेमध्ये 'झो मंडळी' या टीमने प्रथम क्रमांकाचा मान पटकावला, तर सुमित मालप (vošazadšparinda) याने द्वितीय आणि सौरभ बने याने तृतीय क्रमांक मिळवला. उत्तेजनार्थ पारितोषिके प्रथमेश पवार आणि रिध्देश मांडवे यांनी मिळविली, तर प्रेक्षकांच्या पसंतीचा 'बेस्ट रील'चा बहुमान नविल भोळे याने आपल्या नावे केला.

या दिमाखदार बक्षीस वितरण सोहळ्याला रत्नागिरीच्या नगराध्यक्ष शिल्पा सुर्वे, नगरसेविका मेधा कुलकर्णी, नमन लोककला मंडळाचे पी.टी.कांबळे, अकील नाईक आणि परेश साळवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करतानाच, कोकणची लोककला डिजिटल माध्यमाद्वारे नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले. 'काय समजलीव' या उपक्रमामुळे कोकणातील तरुण कलाकारांना आपली प्रतिभा जागतिक स्तरावर नेण्यासाठी एक नवी प्रेरणा मिळाली आहे.

# माहिती अधिकार कायद्यातील वादग्रस्त बदलांना स्थगिती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पुढाकार, अण्णा हजारेंच्या मागण्यांची दखल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** राज्य माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या वादग्रस्त बदलांना अखेर राज्य सरकारने स्थगिती दिली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या बदलांविरोधात आंदोलनाची भूमिका घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः पुढाकार घेत हस्तक्षेप केला. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला पत्र पाठवून अण्णा हजारे यांच्याशी चर्चा होईपर्यंत कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये, अशी विनंती केली होती. त्यानंतर राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी या पत्राची दखल घेत १२ जून रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व वादग्रस्त बदलांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अण्णा हजारे यांनी जाहीर केलेल्या आंदोलनाला यश मिळाल्याचे मानले



जात आहे. यापूर्वी राहुल पांडे यांनी राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारे यांची भेट घेत चर्चा केली होती.

मात्र, समाधानकारक तोडगा निघत नसल्याने अण्णा हजारे यांनी उपोषणाचा निर्णय कायम ठेवला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप करत माहिती आयोगाला पत्र पाठवले आणि अण्णा हजारे यांच्याशी चर्चा झाल्याशिवाय पुढील निर्णय घेणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट केले. या पत्रानंतर मुख्य माहिती आयुक्तांनी वादग्रस्त बदलांना स्थगिती देण्याची घोषणा केली.

दरम्यान, अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात माहिती अधिकार कायद्याची परिणामकारकता कमी करणाऱ्या प्रस्तावित दुरुस्त्या तातडीने मागे घेण्याची मागणी केली होती. तसे न झाल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथे बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. माहिती अधिकार कायदा हा सामान्य नागरिकांच्या हातातील भ्रष्टाचारविरोधातील प्रभावी शस्त्र असून या कायद्याची धार बोथट करण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीसाठी घातक ठरेल, असे त्यांनी पत्रात नमूद केले होते.

प्रस्तावित बदलांमुळे माहिती आयोगाचे अधिकारी कमी होण्याची शक्यता असून नागरिकांना माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली होती. शासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या दोन दशकांत माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली असून सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा प्रभावी ठरला आहे. त्यामुळे या कायद्याचे मूळ स्वरूप कायम ठेवावे आणि जनहिताला बाधा आणणाऱ्या सर्व तरतुदी मागे घ्याव्यात,अशी मागणी अण्णा हजारे यांनी केली होती. सरकारने वादग्रस्त बदलांना स्थगिती दिल्यानंतर या प्रश्नावर व्यापक चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## माढ्याच्या औद्योगिक विकासाला अखेर वेग! मोडनिंब-मेढापूर एमआयडीसीला हिरवा कंदील

### मुंबईतील उच्चस्तरीय बैठकीत आमदार अभिजीत पाटील यांचा प्रभावी पाठपुरावा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** माढा मतदारसंघाच्या विकासाचा कणा ठरणाऱ्या मोडनिंब व मेढापूर एमआयडीसी प्रकल्पांना अखेर गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. अनेक महिन्यांपासून विविध कारणांमुळे रखडलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांबाबत मुंबई येथे उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

आमदार अभिजीत पाटील यांनी दोन्ही प्रकल्पांतील प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर पाठपुरावा करत तातडीने कार्यवाहीची मागणी केली.बैठकीत मोडनिंब व मेढापूर एमआयडीसीच्या उभारणीतील तांत्रिक, प्रशासकीय आणि प्रक्रियात्मक अडचणींचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत सखोल चर्चा करून प्रकल्प रखडण्यामागील कारणे दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आला.

यावेळी उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांनी दोन्ही एमआयडीसी प्रकल्पांची कामे लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन दिले. संबंधित विभागांना आवश्यक समन्वय साधून प्रकल्पांना तातडीने गती देण्याचे निर्देशही देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले की, मोडनिंब आणि मेढापूर एमआयडीसी सुरू झाल्यानंतर माढा मतदारसंघाच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळेल. मोठ्या उद्योगांसोबतच लघु व मध्यम उद्योगांना चालना मिळेल, हजारो स्थानिक



युवकांना रोजगार उपलब्ध होईल आणि परिसराच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल.

औद्योगिक गुंतवणूक वाढविणे, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास या दृष्टीने मोडनिंब-मेढापूर एमआयडीसी प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. त्यामुळे शासनाच्या आश्वासनानंतर आता प्रत्यक्ष कामांना किती वेग मिळतो, याकडे संपूर्ण माढा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

- **मोडनिंब-मेढापूर एमआयडीसीला मिळणार गती**
- **उद्योगमंत्री उदय सामंत यांचे ठोस आश्वासन**
- **आमदार अभिजीत पाटील यांचा पाठपुरावा यशस्वी**
- **तांत्रिक व प्रशासकीय अडथळे दूर होणार**
- **हजारो युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार**
- **माढा मतदारसंघाच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा**

## रयत इंग्लिश स्कूल, शिरवळच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०३, खंडाळा (सातारा) :** रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळ येथील विद्यार्थ्यांनी सन २०२५ – २६ च्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता ५ वीतील कुमार शिवश्री गणेश बामणे हा विद्यार्थी खंडाळा तालुक्यात द्वितीय आला असून जिल्ह्यामध्ये त्याला ग - ४३ हा रँक



मिळाला आहे. इयत्ता आठवीतील कुमार स्मित गणेश गुजर आणि कुमारी. मृगनयनी राहुल सोनमाळी यांनी शिष्यवृत्ती मिळवून शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे यांनी अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला. त्यांनी विद्यार्थ्यांचे मेहनत, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे कौतुक करत भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेच्या पर्यवेक्षिका वासंती घाडगे यांनी देखील या विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले. शाळेचे जनरल बॉडी मेंबर आप्पासाहेब देशमुख यांनी ही या विद्यार्थ्यांचा कौतुक केलं केलं तसेच एसएमसी मेंबर पीटीए मेंबर कडूनही या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थांना मिळवलेल्या या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन यांनीही आनंद व्यक्त केला असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली आहे.

# महाबळेश्वर नगरपालिका प्रशासकीय इमारत आराखड्यास मंजुरी

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०३, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उभारणीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. नगररचना विभागाने (टाऊन प्लॅनिंग) सुधारित आराखड्यास मंजुरी दिल्याने शहराच्या विकासाला नवे बळ मिळाले आहे. विशेष म्हणजे, संबंधित भूखंडावरील विद्यमान शाळेची इमारत कायम ठेवत नवीन प्रशासकीय इमारतीस परवानगी देण्यात आल्याने विकास आणि शैक्षणिक हित यांचा समतोल साधण्यात आला आहे.



या प्रकल्पासंदर्भात न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांमुळे काही काळ कामाला अडथळे निर्माण झाले होते. मात्र न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नगरपरिषदेला पुढील कार्यवाहीचा मार्ग मोकळा झाला. मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद पाटील यांच्या सहकार्याने तसेच लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील शिंदे, नगरसेवक आणि मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला. तज्ज्ञांच्या माध्यमातून सुधारित मास्टर प्लॅन तयार करून तो नगररचना विभागाकडे सादर करण्यात आला आणि अखेर त्यास मंजुरी मिळाली.

सुधारित आराखड्याचे वैशिष्ट्य म्हणजे, भूखंडावरील शैक्षणिक वारसा जपत विद्यमान शाळांच्या इमारती अबाधित ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांवर कोणताही परिणाम न होता आधुनिक प्रशासकीय इमारतीचे नियोजन करण्यात आले आहे. विकास आणि जनहिताचा समतोल राखणारा हा निर्णय असल्याचे मानले जात आहे.

प्रस्तावित प्रशासकीय संकुलात विविध शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी कार्यरत होणार असून, त्यामुळे नागरिकांना विविध कामांसाठी वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये जावे लागणार नाही. एक शहर – एक प्रशासन ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

नगराध्यक्ष सुनील शिंदे, नगरसेवक आणि मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी न्यायालयीन प्रक्रिया, तांत्रिक मंजुरी तसेच प्रशासकीय स्तरावरील विविध बाबींचा सातत्याने पाठपुरावा करून प्रकल्पाला गती दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे प्रशासकीय इमारतीच्या उभारणीसाठी आवश्यक असलेली महत्त्वाची मंजुरी मिळाल्याचे सांगितले जात आहे.

या निर्णयामुळे महाबळेश्वरमधील व्यापारी, नागरिक आणि विविध सामाजिक घटकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, शहराला आधुनिक, प्रशस्त आणि सर्वसमावेशक प्रशासकीय इमारत मिळण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याची भावना व्यक्त होत आहे.

**महाबळेश्वरच्या विकासाला नवी दिशा**

– न्यायालयीन अडथळे दूर.

– नगररचना विभागाकडून सुधारित आराखड्यास मंजुरी.

– विद्यमान शाळांच्या इमारती कायम ठेवून नवीन प्रशासकीय इमारतीस परवानगी.

– विविध शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा.

– मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद पाटील, नगराध्यक्ष सुनील शिंदे, नगरसेवक आणि प्रशासनाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश.

सदैव महाबळेश्वरचा विकास हाच ध्यास या भूमिकेतून करण्यात आलेल्या प्रयत्नांमुळे शहराच्या विकासाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा टप्पा पार पडल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# पारनेर-नगर मतदारसंघातील सिंचन प्रकल्पांना गती

## आमदार दातेंच्या मागणीनुसार मंत्रालयात आढावा बैठक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित सिंचन व कालवा विकास कामांना गती देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. आमदार दाते यांनी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मतदारसंघातील महत्त्वाच्या सिंचन प्रकल्पांच्या कामांचा स्वतंत्र आढावा घेण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची तात्काळ दखल घेत मंत्री महोदयांनी मंत्रालयात संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावून प्रत्येक कामाचा सविस्तर आढावा घेत आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी जलसंपदा विभाग सचिव एकनाथ डवले, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत दादा गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, कार्यकारी संचालक धुमाळ साहेब, मुख्य अभियंता चोपडे साहेब, अधिक्षक अभियंता अलका अहिरराव, अधिक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर, कार्यकारी अभियंता जगदिश पाटील, कार्यकारी अभियंता बरकले इ. अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत पिंपळगाव जोगा डावा कालवा अस्तरीकरणाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

जुन्नर तालुक्यातील कालवा दुरुस्ती तसेच पारनेर तालुक्यातील कि.मी. ४७ ते ७३ या लांबीच्या नव्या लाइनिंग प्रस्तावाची सद्यस्थिती तपासण्यात आली. दोन्ही प्रस्ताव अंतिम मंजुरीच्या टप्प्यावर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी पारनेर हद्दीतील अस्तरीकरणाला प्रशासकीय मान्यता मिळाल्याने संबंधित कामाची निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कार्यकारी संचालकांना दिले.

पठार भागातील पुणेवाडी, राळेगणसिद्धी आणि जातेगाव येथील उपसा सिंचन योजनांबाबत ही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. या योजनांसाठी पाणी उपलब्धतेचा दाखला मिळावा म्हणून प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करण्यात आला असून, पाणी उपलब्धतेचा अहवाल प्राप्त होताच सर्वेक्षण व पुढील प्रशासकीय प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे ठरविण्यात आले.

गोदावरी खोरे विकास महामंडळांतर्गत पिंपळगाव रोठा, वनकुटे आणि मांडवे खुर्द येथील लिफ्ट सिंचन योजनांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. या योजनांचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्यासाठी यापूर्वीच कार्यादेश देण्यात आले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मात्र पाणी उपलब्धतेचा अंतिम अहवाल प्राप्त होणे बाकी असल्याने तो मिळाल्यानंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया व प्रत्यक्ष कामाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

तांबडीकार, निमदरी, मोरवाडी आणि वारणवाडी येथील साठवण तलाव योजनांबाबत ही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. या योजनांसाठी आवश्यक पाणी उपलब्धतेचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले असून संबंधित विभागाकडून मंजुरी मिळाल्यानंतर सर्वेक्षण व पुढील काम तातडीने सुरू करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

मांडओहळ कालवा अस्तरीकरणाच्या प्रस्तावाचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. या कामाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला असून प्रशासकीय मान्यता मिळताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या बैठकीत आमदार काशिनाथ दाते यांनी प्रत्येक कामाचा बारकाईने पाठपुरावा करत मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अडचणी मंत्री महोदयांसमोर प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सिंचन योजनांना गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दुसरीकडे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्परतेने बैठक आयोजित केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना वेळेत कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील सिंचन प्रकल्पांबाबत आमदार काशिनाथ दाते यांनी सातत्याने पाठपुरावा करून ही आढावा बैठक आयोजित करण्यासाठी विशेष आग्रह धरला. त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीमुळे संबंधित कामांचा सविस्तर आढावा घेणे शक्य झाले. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी दाखवलेली तळमळ निश्चितच कौतुकास्पद आहे. शासन त्यांच्या सर्व मागण्यांबाबत सकारात्मक असून, संबंधित कामे गतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

**- नामदार राधाकृष्ण विखे पाटील (जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री)**

---

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सिंचन प्रश्नांवर आज मंत्रालयात सविस्तर आढावा बैठक पार पडली, याचे समाधान आहे. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी माझ्या पाठपुराव्याची दखल घेत सर्व विषयांवर सकारात्मक चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट व वेळबद्ध सूचना दिल्या, याबद्दल मी त्यांचे मतदारसंघातील जनतेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानतो.

**- आमदार काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

# पिंपळगाव बसवंत येथे ज्येष्ठ नागरिकाची बँक फसवणूक; ATM कार्ड बदलून ४० हजार लांबवले

## सेवानिवृत्त जिल्हा बँक अधिकाऱ्याला लक्ष्य करत दोन अज्ञातांनी घातला गंडा; पिंपळगाव पोलिसांत गुन्हा दाखल

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** एटीएम केंद्रात पैसे काढण्यासाठी गेलेल्या एका ७५ वर्षीय वृद्धाचे एटीएम कार्ड हातचलाखीने बदलून, त्यांच्या खात्यातून ४० हजार रुपयांची रक्कम काढून फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे फसवणूक झालेले वृद्ध हे जिल्हा बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी आहेत.

याप्रकरणी पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात दोन अज्ञात भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय?**

दत्तात्रय म्हातारबा निफाडे (वय ७५, रा. एस.बी.आय. बँक कॉलनी, शिरसगाव रोड, पिंपळगाव बसवंत) हे २९ जून रोजी सायंकाळी ४ ते ५ वाजेच्या सुमारास येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (SBI) एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. ते पैसे काढत असताना तेथे उपस्थित असलेल्या दोन अज्ञात आरोपींनी त्यांच्या नकळत हातचलाखी करून त्यांचे एटीएम कार्ड बदलले. त्यानंतर निफाडे यांच्या संमतीशिवाय आणि त्यांना समजायच्या आत आरोपींनी त्यांच्या बँक खात्यातून तब्बल ४० हजार रुपयांची रोकड काढून घेत पोबारा केला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर निफाडे यांनी तातडीने पोलिसांत धाव घेतली.

**नवीन कायद्यान्वये गुन्हा दाखल**

या प्रकरणी दत्तात्रय निफाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात दोन अज्ञात आरोपीं विरुद्धभारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१६(२), ३१८(४), ३१९(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपास सुरू :-

या घटनेचा पुढील तपास पिंपळगाव पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस हवालदार निकिता महाले करत आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध घेतला जाण्याची शक्यता आहे.

बँक ग्राहकांना आवाहन :-

एटीएममध्ये पैसे काढताना अनोळखी व्यक्तींची मदत घेऊ नका आणि आपला पिन क्रमांक तसेच एटीएम कार्ड सुरक्षित ठेवा, असे आवाहन पोलिसांतर्फे करण्यात येत आहे.




# जि.प. उर्दू प्राथमिक शाळा, चारठाणाची घवघवीत कामगिरी; ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०३, चारठाणा (परभणी) :** जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, चारठाणा येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता पाचवीतील एकूण ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून त्यांच्या यशामुळे शाळा व गावाच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये पठाण बीबी फातोमा अजिज खान, शेख नवेला ताज अलीम, शेख अस्मा अहमद, कुरेशी आलिया इस्माईल, काजी सिद्रा फातिमा तौफीकुद्दीन, सय्यद नशरा खतिजा अब्दुल अली आणि सय्यद शाहिदा अनसार यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक सय्यद अनवर सर, वर्गशिक्षक शेख कामरान सर तसेच शिक्षकवृंदाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे जुबेर अन्सारी सर, अब्दुल हबीब सर, पठाण रेहमान सर, अतीक अन्सारी, अब्दुल सर, आईशा बाजी, हेमंत बाजी, फातिमा बाजी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य आणि पालकांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे चारठाणा परिसरात आनंदाचे वातावरण असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे पुन्हा एकदा दर्शन घडल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# कातकरी समाजात जनजागृतीची नवी दिशा

## गणेशनगर (कोर्टी) येथे समुपदेशन कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०३, उंब्रज (सातारा) :** गणेश नगर (कोर्टी) येथे कातकरी समाजातील नागरिकांमध्ये आरोग्य, शिक्षण आणि कायद्याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने कोर्टी ग्रामपंचायत, उंब्रज पोलीस ठाणे, रोटरी क्लब आणि प्राथमिक आरोग्य केंद्र उंब्रज यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महिला, युवक-युवती आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामाजिक परिवर्तनाचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमात उंब्रज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांनी अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह, कमी वयातील गर्भधारणा आणि त्यातून आई व बाळाच्या आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अल्पवयीन विवाह हा केवळ सामाजिक प्रश्न नसून कायद्यानेही गुन्हा असल्याचे सांगत, अशा प्रथांना समाजानेच आळा घालण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.प्राथमिक आरोग्य केंद्र उंब्रजच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रेया खंडागळे यांनी महिलांशी संवाद साधताना लहान वयातील गर्भधारणेमुळे उद्भवणारे आरोग्यविषयक धोके समजावून सांगितले. गर्भधारणेची वेळेवर नोंदणी केल्यास शासनाच्या विविध आरोग्य योजना, आर्थिक सहाय्य आणि अनुदानाचा लाभ मिळू शकतो, याबाबत त्यांनी माहिती दिली. मुलींचे शिक्षण पूर्ण होणे आणि योग्य वयात विवाह होणे हे निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित करत कातकरी समाजातील मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

समुपदेशनानंतर कातकरी समाजातील युवक-युवतींनी आपल्या समाजात यापुढे अल्पवयीन विवाह होऊ देणार नाही, तसेच अशा चुकीच्या प्रथांविरोधात सक्रिय भूमिका घेऊ, अशी ग्वाही सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांना दिली.या उपक्रमामुळे कातकरी समाजात आरोग्य, शिक्षण आणि कायद्याबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली असून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.कार्यक्रमास ग्रामसेवक ज्योतीराम ढणे, आरोग्य निरीक्षक विकास गरुड, शिक्षण समितीचे अध्यक्ष अमोल यादव, तसेच विवेकानंद जोशी, विनायक जाधव, कमलाकर पाटील, प्रवीण यादव, जयश्री सर्जे, ज्योती थोरात, सुनंदा वाघमारे आणि उर्मिला निकाळजे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.